# प्रकरण : ३

# सांगोला तालुक्याची वैशिष्ठे

# प्रकरण : ३

# सांगोला तालुक्याची वैशिष्ठे

---

**प्रस्तावना :**

महाराष्ट्र राज्यातील सोलापूर जिल्ह्यामधील सांगोला तालुका हा अवर्षणप्रवण (दुष्काळी) तालुका म्हणून ओळखला जातो. सांगोला तालुक्यातील हवामान, जमीन, पर्जन्यमान, सतत पडणारा दुष्काळ तसेच सामाजिक, राजकीय आर्थिक वैशिष्ठयामुळे तेथे महाराष्ट्र शासनाच्या रोजगार हमी योजनेअंतर्गत मोठ्या प्रमाणात रोहयो कामे राबविण्यात आली आहेत. सांगोला तालुका हा माण खोऱ्यातील कमी पाऊस पडणारा तालुका म्हणून ओळखला जातो. सोलापूर जिल्ह्यातील इतर तालुक्याप्रमाणे सांगोला तालुक्यात रोहयो कामे मोठ्या प्रमाणात राबविली आहेत.

## सोलापूर जिल्ह्याची वैशिष्ठे

सोलापूर जिल्हा हा भीमा, सिना, भोगावती, निरा, माण ह्या नदयांच्या खोऱ्यात असून तो महाराष्ट्र व कर्नाटक राज्यांना जोडणारा दुवा आहे. सोलापूर जिल्हा महाराष्ट्राच्या आग्नेय कोपऱ्यात वसलेला असून त्याचे भौगोलिक स्थान १७.१० अक्षांश उत्तरेकडे आणि ७६.१५° पूर्व रेखांश यांच्या दरम्यान आहे. सोलापूर जिल्ह्याचे भौगोलिक क्षेत्रफळ १४८९५ चौ. कि. मी. असून ते महाराष्ट्र राज्याच्या एकूण क्षेत्रफळाच्या शे. ४.८४ टक्के आहे. सोलापूर जिल्हा हा अवर्षणप्रवण (दुष्काळी) जिल्हा म्हणून ओळखला जातो. सोलापूर जिल्ह्याच्या आजूबाजूला सांगली, सातारा, पुणे, बीड, उस्मानाबाद हे जिल्हे येतात. सोलापूर जिल्ह्यात १९६० पासून दक्षिण सोलापूर, उत्तर सोलापूर, सांगोला, पंढरपूर, माळशिरस, मंगळवेढा, बार्शी, करमाळा, माढा, अक्कलकोट, मोहोळ या ११ तालुक्याचा समावेश होतो. मराठी व कानडी संस्कृतीचा संगम असलेला जिल्हा म्हणून ओळखला जातो.[१]

सोलापूर जिल्हा हा सह्याद्री पर्वतरांगांच्या पर्जन्य छायेत येत असल्यामुळे पावसाचा प्रारंभ व शेवट अनिश्चित स्वरूपाचा असतो. पावसाचे प्रमाण कमी व अनिश्चित स्वरूपाचे असते. सोलापूर जिल्ह्याचे कमाल तापमान ४०.८° से. व किमान तापमान २०.५° से. असते. मान्सूनचा कलावधी जूनच्या पहिल्या पंधरवड्यापासून सप्टेंबर अखेर असतो. या कालावधीतही निश्चीत स्वरूपाचा पाऊस नसतो. १९५३ पासून पर्जन्यमानाची आकडेवारी पाहता दरवर्षीच्या पर्जन्यमानामध्ये बरीच तफावत असून ती

आवश्यकतेपेक्षा कमी आहे. सोलापूर जिल्ह्याचे हवामान उष्ण व कोरडे आहे. सोलापूर जिल्ह्याच्या सीमारेषेवर डोंगराळ प्रदेश नसल्यामुळे जिल्हा वाऱ्याच्या पट्टयात येतो. सर्वसाधारणपणे सरासरी ६५० मि. मी. एवढा पाऊस असतो. पावसाचे प्रमाण कमि असल्यामुळे सोलापूर जिल्ह्यात चक्री पध्दतीने नियमीतपणे अवर्षणाचा फटका बसत राहतो. त्यामुळे जिल्ह्यात सतत अवर्षणाचे व पाण्याच्या दुर्भिक्षणाचे दुष्परिणाम होत असल्याचे ऐतिहासिक काळातून दिसून येते. सोलापूर जिल्ह्यातील उन्हाळ्यातील तापमान ४३° से. असते. सोलापूर हे समुद्रसपाटीपासून ५५० मी. उंचीवर आहे. हा मोठा सपाट दुष्काळी प्रदेश आहे. उन्हाळ्यात मार्च, एप्रिल, मे हे तीन महिने सोडले तर हवामान उष्ण असले तरी सुसह्य व आरोग्यदायी असते.

सोलापूर जिल्ह्यात प्रामुख्याने रब्बी ज्वारी, गहू, मका, हरभरा, कडधान्ये, बाजरी, भाजीपाला, भुईमूग, काही प्रमाणात ऊस, द्राक्षे, डाळींब ही पिके घेतली जातात. सांगोल्याचे डाळींब हे प्रसिध्द आहे. बार्शी तालुक्यात मोठ्या प्रमाणात रब्बी ज्वारी पिकत असल्यामुळे बार्शी ज्वारी प्रसिध्द आहे. सोलापूर जिल्ह्याच्या अकलूज, पंढरपूर, मंगळवेढा, दक्षिण सोलापूर ह्या कृत्रिम पाणीपुरवठ्याची सोय केलेली आहे. त्यामुळे हा भाग सुपिक आहे.[२]

**अवर्षणप्रवण जिल्हा :-**

परदासानी समितीने १९५७ पर्यंतच्या ३० वर्षाच्या कालावधीतील पर्जन्यमान, जाहीर झालेला दुष्काळ, टंचाई परिस्थिती यांचा अभ्यास करून बार्शी व पाटबंधारे लाभक्षेत्रातील माळशिरस तालुक्याचा काही भाग वगळता इतर तालुके अवर्षणप्रवण असल्याचे जाहीर केले आहे. १९६० मध्ये केंद्रिय जलसिंचन आयोगानेही माळशिरस तालुका वगळता सर्व तालुके अवर्षणप्रवण जाहीर केले. सुकथनकर समितीने १९७३ मध्ये जिल्ह्यातील लहरी व तुटपुंज्या पर्जन्यमानाचा सखोल अभ्यास करून माळशिरस व पंढरपूरचा बागायत भाग वगळता संपूर्ण जिल्हा अवर्षणप्रवणक्षेत्र म्हणून जाहीर केला गेला. १९८७ मध्ये सुब्रह्मण्यम समितीने (अवर्षणप्रवणक्षेत्र पुर्निविलोकन समितीने) जिल्ह्यातील सर्व ११ तालुके अवर्षणप्रवणक्षेत्र म्हणून जाहीर केले.[३]

सोलापूर जिल्ह्यातील जमीन मुख्यतः ज्वालामुखींच्या उद्रेकातून निर्माण झालेली आहे. तिचा खालचा थर हा अग्नीजन्य खडकाचा मुरूम या प्रकारात मोडतो. जिल्ह्यातील भीमा नदी ही प्रमुख नदी

असून तिचा उजवीकडील भागात निरा, माण आणि डाव्या भागात सीना, भोगावती ह्या उपनदया आहेत. भीमा नदीकाठावर्ील प्रदेश सुपिक काळसर मातीचा आहे. जिल्ह्यातील बहुतांश जमीन हलक्या प्रतीची आहे. जिल्ह्यातील जमीनीवर वनक्षेत्राचे प्रमाण एकूण जमिनीच्या केवळ २.५ टक्के आहे. भीमा नदीवरील उजनी प्रकल्प हा जिल्ह्यातील मोठा सिंचन प्रकल्प असून पुणे जिल्ह्यातील वीर धरणाच्या, भाटघर धरणाच्या नीरा उजवा कालव्यामुळे जिल्ह्यातील माळशिरस, पंढरपूर, सांगोला तालुक्यातील महूदच्या काही भागांना कृत्रिम पाणी पुरवठ्याद्वारे बागायती क्षेत्र निर्माण झाले आहे. ग्रामीण भागात एकूण लोकसंख्येच्या ७९ टक्के लोक ग्रामीण भागात राहतात. शेती हेच त्यांचे मुख्य उपजीविकेचे साधन आहे. अवर्षणप्रवणक्षेत्र विकास आणि पाणलोटक्षेत्र विकास अंतर्गत जिल्ह्यात रोजगार हमी योजनेची कामे मोठ्या प्रमाणात राबविली आहेत.

सोलापूर हे चादरीसाठी प्रसिध्द शहर आहे. शेती हा मुख्य व्यवसाय सोलापूर जिल्ह्यात असून शेतीबरोबर पशुपालनाचाही व्यवसाय केला जातो. धार्मिक दृष्ट्याही सोलापूर जिल्हा महत्वाचा असून पंढरपूर, तुळजापूर, अक्कलकोट, गाणगापूर, सोलापूर जिल्ह्यातील सिध्देश्वर मंदिर ही धार्मिक स्थळे प्रसिध्द आहेत. पंढरपूरमुळे सोलापूर जिल्ह्यास वारकरी संप्रदायाचा जिल्हा म्हणून ओळखले जाते. सोलापूर जिल्ह्याची प्रमुख भाषा मराठी असून ८० टक्के लोक ग्रामीण भागात मराठी बोलतात. सोलापूर हे स्पिनींग मिलसाठी प्रसिध्द आहे.[४]

## सांगोला तालुक्याची वैशिष्ठे

सोलापूर जिल्ह्यातील सांगोला तालुका हा अवर्षणप्रवण (दुष्काळी) तालुका म्हणून ओळखला जातो. भौगोलिक परिस्थितीचा मानवी जीवनाच्या जडणघडणीवर मोठ्या प्रमाणावर परिणाम होतो. लोकांच्या उत्पादनाची साधने, राहणीमान, संस्कृती आणि भाषा भौगोलिक परिस्थितीने ठरते. सांगोल्याच्या बाबतीतही असेच घडले आहे. सांगोला पूर्वीच्या माण परगण्यात व मध्याच्या भाषेत अवर्षणप्रवण क्षेत्रात मोडतो. सांगोला हे सोलापूर जिल्ह्याच्या दक्षिण-पश्चिम भागातील तालुक्याचे ठिकाण आहे. सांगोला हे १७०.२६ $^{१}/_{२}$ उत्तर अक्षांश व ७५.१२° रेखांशावर वसले आहे. सांगोल्याची समुद्रसपाटीपासूनची उंची ६०१.४ मीटर इतकी आहे. सांगोला तालुका हा सह्याद्री पवर्तरांगेच्या छायेत येतो. सांगोला तालुक्यापासून ३० कि. मी. अंतरावर सह्याद्रीच्या पर्वतरांगा आहेत. सांगोला तालुक्यात माण व कोरडा ह्या नदया आहेत.

सांगोला तालुक्याच्या पश्चिम-दक्षिण दिशेला माण ही नदी आहे. ही नदी उन्हाळा, पावसाळा, हिवाळा या तीन ऋतूमध्ये कोरडी असते. पूर्वी सांगोला तालुक्यात गाव गाड्याच्या रचनेप्रमाणेच त्याची रचना व जीवन व्यवहार होते. मुख्य शेतकरी बारा बलुतेदार, अलुतेदार यांचे परस्परावलंबी पण स्वयंपूर्ण खेड्याचे जीवन होते. आजही सर्व समाज कमी-अधिक प्रमाणात येथे नांदतो आहे. सांगोला तालुक्यास माणदेशचा भाग असेही म्हटले जाते. १९०३ साली सांगोला हे सोलापूर जिल्ह्यात आले व नंतर सांगोला तालुका निर्माण झाला. पूर्वीपासूनच सांगोला तालुक्यात शेती हा व्यवसाय केला जातो. शेतीबरोबर पशुपालनाचाही व्यवसाय केला जातो. माण परगण्यातील ती एक स्थानिक बाजारपेठ आहे. सांगोला तालुका हा प्रामुख्याने डाळींब, बोर या पळबागांचा तालुका म्हणून ओळखला जातो. सांगोला तालुक्यात लहान-मोठी सुमारे ८७ गावे आहेत. सांगोल्यातील सूत गिरण (स्पिनींग मिल) ही भारतातील तीन क्रमांकामध्ये असून तिने अनेक प्रशस्तीपत्रके व पारितोषिके मिळविली आहेत. सांगोला तालुक्यात महूदजवळ एक साखर कारखाना आहे. सांगोला तालुक्यात रस्ते, रेल्वे यामुळे वाहतुकीची सोय आहे.

**हवामान :-**

सांगोला तालुक्याचे हवामान उष्ण व कोरडे आहे. वर्षातील १० महिने निरभ्र आकाश व स्वच्छ सूर्यप्रकाश असतो. अतिउष्ण उन्हाळे, उबदार हिवाळे व अनिश्चित पाऊस असे ऋतुमान आहे. उन्हाळ्यात कमाल तापमान ४४° से. ग्रे. व किमान तापमान ३५.१° से. ग्रे. असते. हिवाळ्यात कमाल तापमान २९.२९° से. ग्रे. व किमान तापमान १८.८° से. ग्रे. असते.

**पर्जन्यमान :-**

सांगोला तालुक्यात पावसाचे प्रमाण अत्यंत कमी आहे. एवढेच नव्हे तर ते अनिश्चित स्वरूपाचे आहे. पावसाला ह्या भागात उशिरा सुरूवात होते. त्यावर खरिपाची पेरणी होते पण मध्यंतरी १५ जुलै ते ३० ऑगस्ट या काळात पावसात फार मोठा खंड पडतो. मोठ्या प्रमाणात वारे कोरडे वाहू लागतात. सप्टेंबरमध्ये ईशान्य मान्सून वाऱ्यापासून पाऊस थोडाफार होतो. त्यावर रब्बी पिकाच्या पेरण्या होतात. काहीवेळा सरसारीपेक्षा कमी पाऊस पडतो तो ही वेळेवर पडत नाही. मान्सूनपूर्व मे महिन्यात वादळी पाऊस पडतो. तो ही अनिश्चित स्वरूपाचा असतो. १९८४ मध्ये महाराष्ट्रातील डॉ. व्ही. सुब्रह्मण्यम

यांच्या अध्यक्षतेखाली समिती नेमण्यात आली. या समितीने सांगोला तालुका हा ९४ तालुक्यांपैकी एक अवर्षणप्रवण तालुका म्हणून घोषित केला. तसेच सुकथनकर समिती, परदासानी समितीनेही तालुका दुष्काळग्रस्त म्हणून घोषित केला. तालुक्यात पावसाला काही वेळा उशिरा सुरूवात होते. तर काहीवेळा नेहमीपेक्षा पाऊस लवकर थांबतो तर काही वेळा पावसाळ्यातही खंड पडतो. सांगोला तालुक्यातील सरासरी पर्जन्यमान ५९१ मि. मी. आहे.

**जमीन :-**

सांगोला तालुक्यातील जमीन ही बहुतांश हलक्या प्रतीची असून खडकाळ, फिकट करड्या रंगाची कमी कसाची साधारण २३ ते ९० से.मी. जाडीची आढळते. तालुक्यातील माण नदी काठावरील जमिन ही चिकणमाताची आहे. ओढ्याकाठावरील काही जमीन सुपीक आहे. तालुक्यातील कोळे गटाकडील जमीन ही डोंगराळ, सपाट प्रदेशाची आहे. इतर भागातील जमीन ही माळरान, लहान-मोठ्या टेकड्याची, सपाट प्रदेशाची आहे. तालुक्यात पडीकक्षेत्र जास्त प्रमाणात आहे. तालुक्यातील प्रदेश दख्खन पठाराने व्यापलेला असून जमीन ही निरनिराळ्या खोलीची तसेच खडकाळ, मुरूम प्रकाराची आहे. तालुका क्षेत्रातील भूजलाचा उपसा प्रतिवर्षाच्या पुर्नभरणापेक्षा जास्त प्रमाणात केल्यामुळे त्याचा परिणाम भूजलाचे अचल साठ्यावर परिणाम होऊन उन्हाळ्यात विहीरी कोरड्या पडतात. पिण्याच्या पाण्याची पाऊस पडूनही ग्रामीण भागात टंचाई परिस्थिती निर्माण होते. भूजलपातळी ४० ते ५० फुटापर्यंत असते. विंधण विहिरी २०० ते ३०० फुटापर्यंत गेल्या आहेत. विहिरी व विंधण विहिरीमधील पाणी उपसा विदयुत उर्जेच्या वापरामुळे जमिनीतून मोठ्या प्रमाणात केला जातो. त्यामुळे भूजल पातळी खालावलेली आहे.

**पिकपध्दती :-**

सांगोला तालुक्यात महूदचा काही भाग वगळता कृत्रिम पाणीपुरवठ्याची सोय नाही. संपूर्ण शेती ही पावसाच्या पाण्यावर अवलंबून आहे. त्यामुळे तालुक्यात कमी पाण्यावर लवकर येणारी पिके घेतली जातात. तालुक्यात बागाईत क्षेत्र एकूण क्षेत्राच्या २० टक्के आहे. ८० टक्के क्षेत्र जिराईत, पडीक या क्षेत्रात मोडते. प्रामुख्याने रब्बी ज्वारी, बाजरी, गहू, हरभरा, कडधान्ये इ. पिके घेतली जातात. कमी पाण्यावर, जास्त उत्पादन देणारी पिके म्हणून डाळींब, बोर, सिताफळ, आवळा ह्या फळबागांचीही लागवड मोठ्या

प्रमाणात होते. तालुक्यातील ओलिताखालील क्षेत्र विहिरीच्या पाण्यावर अवलंबून आहे. दोन्ही हंगामात पिके घेतली जातात. एखादया हंगामात पाऊस पडला नाही तर तो हंगाम तसाच वाया जातो. या तालुक्यात पिकांची निवड करताना कमी पाण्यावर येणारी, कमी कालावधीची, अधिक उत्पादन देणारी पिके घेतली जातात. तालुक्यातील १ ते २ टक्के क्षेत्रावर वनक्षेत्र मोडते.

सांगोला तालुक्यातील स्वच्छ, कोरडी व सूर्यप्रकाशयुक्त व पाण्याचा निचरा होणारी जमीन आहे. डाळिंब या फळबागेसाठी अनुकूल जमीन, हवामान असल्यामुळे डाळींबाची लागवड मोठ्या प्रमाणात केली जाते. भगवा, गणेश, आरक्ता, ह्या जातींच्या डाळिंबाची मोठ्या प्रमाणात लागवड केली आहे. ह्या डाळींबाना देशात, परदेशात खूपच मागणी असून शेतकऱ्यांच्या दृष्टीने ती फायदेशीर ठरत आहे. दरही वाजवी मिळत असल्यामुळे तालुक्यात डाळींब बागांची मोठ्या प्रमाणात लागवड होत आहे. शेतकऱ्यांना पैसा मिळवून देणारे पिक आहे. तालुक्यातील डाळींब उत्पादनामुळे शेतकऱ्यांची आर्थिक स्थितीही मजबूत झाली आहे. सांगोल्यात खरेदी-विक्री संघही आहे. सोलापूर येथे डाळींब संशोधन केंद्र उभारण्यात आले आहे. डाळींबाबरोवर बोर ह्या फळबागाचीही मोठ्या प्रमाणावर लागवड होते. याशिवाय सिताफळ, चिकू, आवळा ह्या फळबागांचेही उत्पादन घेतले जाते. आज सांगोला डाळींब म्हणून देशपातळीवर तालुक्याची ओळख झाली आहे. आपली परंपरागत शेती सोडून फळबागांकडे शेतकरी वळत आहे. या फळबागा वाढासाठी सांगोला तालुक्यात १९७२ पासून राबविण्यात आलेल्या रोजगार हमी योजनेच्या कामाची मदत झाली आहे. रोहयो कामे राबविले असल्यामुळे पडणारे पावसाचे पाणी जागोजागी अडवून तेथील फळबागांना फायदा झाला आहे.[५]

सांगोला तालुक्यात शेती हाच मुख्य व्यवसाय आहे. पावसाचे प्रमाण कमी व अनिश्चित स्वरूपाचे आहे. तसेच वारंवार पडणाऱ्या दुष्काळामुळे शेतकरी व शेतमजूरांना वर्षभर शेतात रोजगार मिळत नाही. महाराष्ट्र शासनाने अवर्षण क्षेत्र कमी करण्यासाठी पाणलोट क्षेत्र वाढविण्यासाठी मजूरांना उत्पादक काम मिळण्यासाठी, मजुरांना मागणीनुसार रोजगार पुरविण्यासाठी रोजगार हमी योजनेअंतर्गत नालाबंडिंग, कंटुरबंडिंग, गावतलाव, पाझरतलाव, विहिरी, रस्ते, बंधारे, शेततळी इ. अनेक कामे तालुक्यात राबविण्यात आली आहेत. तालुक्यात मेंढपाळ व्यवसाय करणाऱ्याचे आज प्रमाण कमी झाले आहे. पावसाचे प्रमाण कमी असलेतरी रोहयोची कामे मोठ्या प्रमाणात राबविल्यामुळे पडणारे पावसाचे पाणी जागो-जोगी अडवून बागाईत क्षेत्र वाढविण्यास मदत झाली आहे.

सांगोला तालुक्याचे महत्वाचे वैशिष्ठ म्हणजे पर्जन्यातील खंड व मोठा कोरडा कालावधी होय. सांगोला तालुक्यात वनक्षेत्राचे प्रमाण खूपच कमी आहे. झाडी तुरळक व काटेरी खुरट्या स्वरूपाची आहेत. सांगोला तालुक्यातील सांगोला शहरास, ५२ गावांना पंढरपूर येथील भीमा नदीतून पिण्याच्या पाण्याचा पुरवठा केला आहे. सांगोला तालुक्यात वाहतूकीसाठी सर्व गावांना जोडणारे रस्ते आहेत. सांगोला तालुक्याच्या शेजारी मंगळवेढा, पंढरपूर, माळशिरस, आटपाडी, कवठेमहांकाळ, मिरज हे तालुके आहेत.[६]

## सांगोला तालुक्यातील सामाजिक चळवळी

सांगोला तालुक्यात प्रामुख्याने हिंदू व मुस्लीम या दोन धर्माचे लोक मध्ययुगीन काळापासून राहत आहेत. मुस्लीम समाजातील लोक व्यापार, लहान-लहान व्यवसाय, शेती आणि नोकरी करणारी आहेत. सर्वच दृष्टीने तो मागासलेला आहे. हिंदू समाजाचे बहुसंख्य लोक असले तरी तो वर्ण जाती उपजातीत विभागलेला आहे. सांगोला तालुक्यात मोठ्या संख्येने धनगर जातीचे लोक आहेत. याशिवाय मराठा, ब्राम्हण, माळी, साळी, लिंगायत, अनुसूचित जाती-जमातीचे लोक, लोणारी, यलमार इ. अनेक जातीचे लोक राहतात. सांगोला तालुक्यात १८ पगड जातीचे लोक तालुकाभर विखुरलेले आहेत. डॉ. आंबेडकरांच्या चळवळीनंतर येथील दलित समाजाने पूर्वापार हलक्या दर्जाची कामे करण्याचे सोडून दिले आहे. आता हा समाज संघटित व जागृत होत आहे. सांगोल्याच्या या संमिश्र समाजामुळे त्यास राजकीय, सामाजिक, जीवनाला काही वैशिष्ठे प्राप्त झाली आहेत.

बहुजन समाजाला उच्च वर्णीयांच्या गुलामगिरीतून मुक्त करण्यासाठी म. ज्योतिराव फुले यांनी सुरू केलेल्या चळवळीचे लोणही सांगोल्यात पोहचले होते. येथील सरदार शामराव लिगाडे शिकारीच्या छंदामुळे व नातेसंबंधामुळे कोल्हापूरच्या राजर्षी शाहू महाराजांच्या सान्निध्यात आले. त्यांच्या विचारांचा प्रभाव होऊन सरदार शामराव लिगाडे आणि सांगोला परिसरात (सत्यशोधकीय) ब्राम्हणेत्तर चळवळ सुरू केली. पुरोहित वर्गाचे वर्चस्व, धार्मिक आणि सामाजिक गुलामगिरी आणि सावकरी या शोषणात भरडला जात असलेल्या बहुजन समाजाला मुक्त करण्यासाठी या चळवळीने प्रयत्न केले. शोषणाचे स्वरूप लोकमानसाला समजावून दिल्यामुळे या चळवळीला सांगोला तालुक्यात लोकमानसाचा चांगलाच पाठिंबा मिळाला. त्यांनी जलशाच्या माध्यमातून खेड्यापाड्यात विचारांचा प्रचार व प्रसार केला. या चळवळीने अन्याय करणाऱ्या पुरोहित वर्गात व सावकारांत दहशत बसविली.

ब्राम्हणेत्तर चळवळीचे लोण सांगोल्यातच नव्हे तर सोलापूर जिल्ह्यात पसरले. त्यांनी केलेल्या कार्यामुळे ब्राम्हणेत्तर चळवळीच्या बाबतीय एक वेळ सातारा जिल्हा परवडेल पण सोलापूर जिल्हा नको असा शेरा ''केसरी'' या वर्तमानपत्राने मारला होता. महाराष्ट्र पातळीवरील केशवराव जेधे, दिनकराव जवळकर, भास्करराव जाधव, बागडे वकील, कर्मवीर भाऊराव पाटील इ. नेते मंडळी सांगोल्यात येऊन गेली होती.

१९२२ साली कडलास येथे ब्राम्हणेत्तर चळवळीची भव्य परिषद भरली होती. १९२७ साली वाटंबरे येथे दुसरी परिषद सरदार शामराव लिगाडे यांच्या अध्यक्षतेखाली व दिनकरराव जवळकर यांच्या उपस्थितीत पार पडली.

या चळवळीने बहुजन समाजात अन्याय विरूध्द जागृती केली. लिगाडे यांना ग्रामीण भागात लोकांचा पाठिंबा असल्याने ते जिल्हा लोकल बोर्डाचे अध्यक्ष व मुंबई असेम्बलीचे सदस्यही झाले. या चळवळीने सरदार शामराव लिगाडेच्या रूपाने सोलापूर जिल्ह्यातील पहिले ग्रामीण नेतृत्व निर्माण झाले. त्यांच्यामुळे सांगोला तालुक्यात आजपर्यंत रूजलेल्या शेतकरी कामगार पक्षाची पार्श्वभूमी तयार झाली.[७]

## सांगोला तालुक्यातील काँग्रेसची स्वातंत्र्य चळवळ

१९२० पर्यंत काँग्रेसची चळवळ नागरी भागात व सुशिक्षितातच होती. पण पुढे महात्मा गांधींच्या नेतृत्वाखाली झालेल्या सर्वव्यापी आंदोलनाचे लोण ग्रामीण भागात पोहचले. ग्रामीण जनताही हळूहळू या चळवळीत सहभागी झाली. रावसो सोपान आबाजी पतंगे हे तालुक्यातील काँग्रेसचे पहिले अध्यक्ष होते. कै. नागेश परशुराम चितळे या सगळ्या गांधीवादी कार्यकर्त्यांच्या नेतृत्वाखालीच सांगोल्यातील काँग्रेस चळवळीने कार्य केले.

सांगोल्यातील काँग्रेस चळवळीने केलेल्या कार्याचे स्वरूप विविध स्वरूपाचे होते. एका बाजूने ब्रिटिश सरकारच्या अन्याय आणि अत्याचार, शोषण जनतेला पटवून देऊन सरकारच्या विरोधात जाऊन आंदोलन निर्माण करणे, काँग्रेसची ध्येयधोरणे जनतेपुढे मांडून चळवळ संघटित करणे असे या चळवळीचे स्वरूप होते. सांगोल्यातील काँग्रेस चळवळीचा भर प्रामुख्याने स्वदेशी ग्रामोद्योगावर होता. सांगोला तालुक्यात चितळे मामांनी स्वदेशी चळवळीचा प्रसार करण्यासाठी अत्यंत परिश्रम घेतले. कापसापासून कापडापर्यंतच्या सर्व प्रक्रिया सांगोला परिसरात सुरू केल्या. चरखा संघ स्थापून शेकडो चरखे कार्यकर्त्यांना वाटले व सूत

UNIVERSITY, KOLHAPUR

उत्पादनास प्रारंभ केला. त्यावेळी सोलापूर जिल्ह्यात सूत व घोंगडी उत्पादन इ. ग्रामोद्योग सुरू केले. १९३० साली मिठाच्या सत्याग्रहात चितळेमामा व त्यांच्या सहकार्यने हमीद येथे क्षार युक्त जमिनीत मीठ उत्पादन केले. त्यावेळी त्यांना अटक झाली होती.

सांगोला येथे जमावबंदी आदेश असतानाही २० मे १९३० रोजी राष्ट्रीय ध्वज लावून काँग्रेसने सभा घेतली. म्हणून सरकारने श्री. ना. म. चितळे, गोपीलाल पांडे इ. व्यक्तींना अटक केली होती. जालियनवाला हत्याकांडाच्या स्मरणार्थ मंगेवाडी येथे राष्ट्रीय सप्ताहाचा कार्यक्रम घेतला होता. २१ मार्च १९३५ रोजी डॉ. के. बी. अंत्रोळीकर यांच्या अध्यक्षतेखाली सांगोला येथे काँग्रेसची सभा झाली. मा. कै. शंकरराव देव हे या सभेस प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित होते. त्यांनी मार्गदर्शन करून सदस्यांची नोंदणी केली. सांगोला तालुक्यातील अनेक खेड्यात काँग्रेसची स्थापना करून श्री. चितळे आणि गोपीलाल पांडे यांनी सभा घेतल्या. गावोगावच्या कार्यकर्त्यांना मार्गदर्शन व्हावे म्हणून फेब्रुवारी १९३६ साली सांगोला येथे काँग्रेसजनांचा ७ दिवसांचा कॅम्प घेण्यात आला होता. देशभक्त विठ्ठलराव गायकवाड यांनी पुढाकार घेऊन तालुकाभर प्रचार केला व शेतकऱ्यांच्या विरोधी असलेल्या सरकारी धोरणाविषयी १९३८ साली मौजे कडलास येथे सानेगुरूजींच्या अध्यक्षतेखाली शेतकरी परिषद घेतली. या परिषदेत सरकारच्या महसूल विषयक धोरणावर शेतकऱ्यांना मिळालेल्या सहानभूतीशून्य वागणूकीविषयी कडाडून टिका झाली. ही परिषद सांगोला तालुक्यात व काँग्रेस चळवळीच्या इतिहासात महत्वपूर्ण ठरली. १९४२ च्या चळवळीत तालुक्यातील ब्रिटिशांच्या विरोधात दहशत निर्माण होईल असे कार्य केले. ८ नोव्हेंबर १९४२ साली बुध्दिहाळ तलावावरील सरकारी बंगला जाळला. याचवेळी प्रभात फेऱ्या काढणे, राष्ट्रीय ध्वज फडकावणे, सभा घेणे, निदर्शने, मोर्चा काढणे इ. विविध प्रकारे ब्रिटिश सरकारच्या विरोधात हालचाली होत होत्या. गोपीलाल पांडे, बापूसाहेब झपके, श्री. भंडारे, सदाशिव चांदणे, तुळशीराम कवडे इ. लोकांनी भाग घेतल्यामुळे त्यांना अटक होऊन तुरूंगवास भोगावा लागला १९४६ साली गोपिलाल पांडे तालुका काँग्रेसचे अध्यक्ष झाल्यावर त्यांनी शेतकऱ्यांच्यात जागृती, पाणीपुरवठ्याचे प्रश्न, अस्पृश्यता निवारण इ. कार्यक्रम होऊन काँग्रेस चळवळीला वेग दिला. यासाठी २ सप्टेंबर १९४६ रोजी सांगोला येथे तालुका पातळीवरील शेतकरी परिषद झाली. १५ ऑगस्ट १९४७ रोजी भारताला स्वातंत्र्य मिळाले आणि काँग्रेसच्या चळवळीचे एक स्वप्न साकार झाले.[८]

## स्वातंत्र्यानंतर सांगोला तालुक्यातील राजकीय वाटचाल

स्वातंत्र्यानंतर सांगोल्याच्या राजकीय वाटचालीत काँग्रेस व शेतकरी कामगार पक्षाचा विचार करणे अपरिहार्य ठरते. सांगोला तालुका हा विधानसभेचा मतदार संघ आहे. त्यामुळे राजकीय पक्ष, त्यांच्या संघटना आणि कार्य याचा विचार सांगोला तालुक्याच्या पातळीवर करणे आवश्यक ठरते.

स्वातंत्र्यानंतर काँग्रेस हा एक राजकीय पक्ष म्हणून उदयाला आला. देशाने लोकशाही शासनप्रणाली स्वीकारल्यामुळे निवडणुकीतील सत्तेच्या स्पर्धा आणि देशबांधणीसाठी केलेले विकासात्मक कार्य आणि राजकीय चळवळ हातात हात घालून वाटचाल करीत होती. १९४७ साली काँग्रेसने अस्पृश्यता निवारण विषयक प्रयत्न केले व प्राथमिक शिक्षणाचा प्रसार व्हावा म्हणून जनजागृती घडविली. संघटनेच्या पातळीवर प्रत्येक खेड्यात ग्राम काँग्रेसची स्थापना करून शेती, शिक्षण आणि नव्या राज्यपध्दती विषयी जनजागृती घडविली.

म. गांधीच्या वधानंतर निर्माण झालेल्या परिस्थितीत दंगल होऊ नये म्हणून काँग्रेसच्या कार्यकर्त्यांनी सांगोल्यात व तालुक्यात शांतता व सुव्यवस्था राखण्याचा प्रयत्न सुरू केला. सामुदायिक प्रार्थना, गांधींच्या विचारांचे निरूपण इ. कार्यक्रम केले. या बिकट परिस्थितीत लोक मानसाला धीर देण्यासाठी व काँग्रेस पक्षाचे विचार समजावून सांगण्यासाठी डॉ. राजेंद्र प्रसाद सोलापूर जिल्ह्याच्या दौऱ्यावर आले होते. याच काळात मा. शंकरराव देव, मा. काकासाहेब गाडगीळ, भाई छन्नूसिंग चंदेले इ. काँग्रेस नेत्यांच्या सभा झाल्या होत्या. स्वातंत्र्याचा पहिला वर्धापन दिन ही काँग्रेसने अनेक उपक्रमांनी साजरा केला. १० आक्टोबर १९४७ रोजी कडलास येथे आयोजित तालुका शेतकरी परिषदेला तत्कालिन मुख्यमंत्री बाळासाहेब खेर, गृहमंत्री मोरारजी देसाई व श्री. यशवंतराव चव्हाण यांनी मार्गदर्शन केले.

१९४८ साली बहुजन समाजवादी पक्षही कार्यरत होता. या पक्षाच्या केशवराव जेधे, क्रांतीसिंह नाना पाटील इ. नेत्यांनी तालुक्याचा दौरा करून स्वातंत्र्यानंतर देशाची सत्ता शेतकरी, कामगारांच्या हाती आली पाहिजे अशी भूमिका मांडली.

काँग्रेसतर्फे सर्वोदय समिती, काँग्रेस सेवादल व ग्रामोद्योग इ. विधायक कार्येही तालुक्यात कार्यरत होती. खादीग्रामोद्योगामध्ये सूतकताई, तेलघाणी, घोंगडी उत्पादन व हातमाग व्यवसाय तालुक्यात अनेक ठिकाणी सुरू होता.[१]

१९४८ साली बहुजन समाजातील केशवराव मोरे, तुळशीदास जाधव, दाजीबा देसाई, उध्वराव पाटील इ. नेत्यांनी एकत्र येऊन शेतकरी कामगार पक्ष्याची स्थापनी केली. सरदार शामराव लिगाडेच्यानंतर या भागातील बहुजन समाजाच्या चळवळीचे नेतृत्व मा. बाळ साहेब मोरे, रावसाहेब सोपान आबाजी पतंगे यांच्याकडे आले. १९५१ साली सांगोल्यात शेकापच्या शाखेची स्थापना झाली. त्यावेळी या पक्षात ब्राम्हणेत्तर चळवळीतील जवळजवळ सर्व कार्यकर्ते सामील झालेले होते. या पक्षाचे अध्यक्ष मा. भिमराव बापूसाहेब चव्हाण व सेक्रेटरी म्हणून आप्पासाहेब बळवंतराव पाटील यांची निवड झाली होती. या पक्षाची विचारसरणी जनतेला समजावून सांगण्यासाठी ३१ डिसेंबर १९५१ रोजी शंकरराव मोरे यांनी सांगोला तालुक्याचा दौरा केला. सांगोला महूद, जवळा या ठिकाणी त्यांच्या जाहीर सभा झाल्या. काँग्रेसतर्फे केशवराव राऊत व शेकापतर्फे रावसाहेब सोपान आबाजी पतंगे यांनी निवडणुक लढविली. त्यात काँग्रेसचे केशवराव राऊत निवडून आले. १९५७ रोजी काँग्रेस पक्षाचे केशवराव राऊत पुन्हा निवडून आले.

१९६२ साली यशवंतराव चव्हाणांच्या नेतृत्वाखाली काँग्रेस पक्षाने महाराष्ट्रात चांगलीच पकड घेतली, परंतु या काळात सांगोला तालुक्यात मात्र शेकापचे भाई गणपतराव देशमुख हे नवे नेतृत्व उदयाला आले. व ते आमदार म्हणून निवडून ही आले. यावेळी सत्तेच्या विकेंद्रीकरणासाठी जिल्हा परिषदांची व पंचायत समितीची स्थापना झाली. सांगोला तालुक्यातील पंचायत समितीच्या निवडणुका होऊन काँग्रेसचे मा. संभाजीराव शेंडे हे सभापती झाले. त्यांनी विकासात्मक दृष्टीने चांगले कार्य केले. नंतरच्या काळात तालुका पातळीवरील काँग्रेसचे निष्क्रीय नेतृत्व, अंतर्गत दुफळी आणि विधायक कार्याचा अभाव यामुळे काँग्रेस पक्षाचा प्रभाव कमि होऊ लागला. याऊलट शेकापने बुध्दिहाळ तलावाखाली गेलेल्या जमिनीची शेतकऱ्यांना योग्य किंमत मिळावी म्हणून आमदार भाई राऊळ यांच्या नेतृत्वाखाली भाई गणपतराव देशमुख व भाई सर्जेराव सगर यांनी चळवळ संघटित केली. व शेतकऱ्यांना योग्य किंमत मिळवून दिली व त्याचे पुर्नवसन केले. निस्पृह नेतृत्व, लोकांच्या प्रश्नांची जाण आणि जनतेचा ठेवलेला सतत संपर्क यामुळे शेकापने सांगोला तालुक्याच्या राजकारणात आपले आसन स्थिर केले. तालुका पातळीवरील पंचायत समिती, कृषी उत्पन्न बाजार समिती, खरेदीविक्रीसंघ इ. सत्ता केंद्रे काबीज केली.

शेकापने सांगोल्या सारख्या दुष्काळी भागाला वीर धरणाचे पाणी मिळावे म्हणून खासदार क्रांतिसिंह नाना पाटील यांच्या अध्यक्षतेखाली सांगोला येथे भव्य पाणी परिषद भरविली. त्यास सर्व विरोधी पक्षांनी पाठिंबा दिला. १९८७ रोजी विधानसभेवर काँग्रेसचे श्री. काकासाहेब साळुंखे यांचा पराभव करून मा.

गणपतराव देशमुख पुन्हा निवडून आले. त्यांनी विधानसभेत व विधानसभेबाहेर सांगोल्यातील दुष्काळी जनतेच्या प्रश्नाला वाचा फोडली. सांगोला तालुका म्हणजे दुष्काळी तालुका अशी प्रतिमा निर्माण केली. निर्दशने, मोर्चा काढून जनतेच्या प्रश्नाविषयी आवाज उठविला.[१०]

१९७२ साली शंकरराव मोहिते पाटलांच्या सहकार्याने गणपतराव देशमुखांच्या १६४० मतांनी पराभव करून काँग्रेसचे काकासाहेब साळुंखे आमदार म्हणून निवडून आले. त्यांनी वीर धरणाचे पाणी सांगोला तालुक्यास मिळावे म्हणून प्रयत्न केले. १९७२ साली भयानक दुष्काळ पडला. दुष्काळात पाझर तलाव, सामूदायिक विहीरी इ. कामे सरकारनी काढली. या काळात गणपतराव देशमुखांच्या नेतृत्वाखाली शेकापच्या कार्यकर्त्यांनी ही कामे योग्य पध्दतीने अंमलात आणण्यासाठी मदत केली. दुष्काळात जनावरे जगविण्यासाठी जुनोनी येथे केंटल कॅम्प काढला. दुष्काळाच्या कालखंडात शेतकरी, शेतमजूरांना संघटित करून शेकापने मोर्चे काढले व लोकांना रोहयोची कामे मिळवून दिली. मार्च १९७३ साली आमदार काकासाहेब साळुंखे यांचे निधन झाल्यावर जानेवारी १९७४ साली झालेल्या विधानसभेच्या पोट निवडणुकीत काँग्रेसच्या सिध्देश्वर झपके यांचा पराभव करून गणपतराव देशमुख १२८०० मतांनी निवडून आले. नंतरच्या काळात काँग्रेसला प्रभावी नेतृत्व न मिळाल्याने शेतकरी कामगार पक्षाने तालुक्याच्या राजकारणावर पकड घट्ट केली.

१९७२ साली दुष्काळी भागाकडे पाहण्याचा दृष्टीकोन बदलला. अवर्षणप्रवण क्षेत्राला सहानभुतीने विकास कार्याचा जादा वाटा मिळू लागला. याचा फायदा सांगोला तालुक्यातील शेकापच्या नेतृत्वाने घेऊन तालुक्यात ३५० पाझर तलाव, २५० प्राथमिक शाळेच्या इमारती, सर्व गावांना दळणवळणाची सोय व्हावी म्हणून एस.टी. डेपो, रस्त्यांच्या सोई, पिण्याच्या पाण्यासाठी सोयी, वाटंबरे, कडलास व वाढेगाव येथील माणनदीवरील व नाझरे, हतीद येथील इ. विकासात्मक कामे करून घेतली.

१९७७ साली देशात आणीबाणी पुकारून काँग्रेस सरकारने दडपशाही सुरू केली. सभा मोर्चांना बंदी केली. आणीबाणीच्या काळात सांगोल्यात सभा घेऊन सरकारवर टीका केल्याबद्दल श्री. उध्दवराव पाटील, गणपतराव देशमुख, भाई सर्जेराव सगर यांना एक महिन्याची शिक्षा झाली. १९७७ साली काँग्रेसचे श्री. बबनराव घाडगे यांचा पराभव करून आमदार गणपतराव देशमुख निवडून आले. मा. शरद पवारांच्या नेतृत्वाखालील पुरोगामी लोकदल आघाडीच्या मंत्रीमंडळात आमदार गणपतराव देशमुख कॅबीनेट दर्जाचे कृषी व ग्रामीण विकास न्याय आणि कायदा खात्याचे मंत्री झाले. त्यांनी कार्यक्षमतेने खात्याचा कारभार

केला. त्यानंतर १९९५ पर्यंत आमदार म्हणून गणपतराव देश मुख निर्विवाद बहुमताने निवडून आले. मुख्यमंत्री विलासराव देशमुखांच्या आघाडी सरकारमध्ये त्यांना रोहयो व पणनमंत्री म्हणून कॅबीनेट दर्जाचे मंत्रीपद मिळाले. परंतु वर्षभरानंतर त्यांनी या पदाचा राजीनामा देला. सन २००४ च्या सार्वत्रिक निवडणुकीत आमदार गणपतराव देशमुख यांनी शहाजीबापू पाटील यांचा २०,००० मतांनी पराभव करून पुन्हा निवडून आले. आमदार गणपतराव देशमुख यांनी सांगोला तालुक्यात रोहयो कामे राबविण्यासाठी खूप प्रयत्न केले. रोहयोची अभ्यासू व्यक्ती म्हणून त्यांच्याकडे पाहिले जाते.[११]

सांगोला तालुक्यातील रोजगार हमी योजनेच्या ज्या तीन गावांचा अभ्यास करावयाचा आहे. त्या लोटेवाडी, करफळ, इटकी गावांची वैशिष्टे खालीलप्रमाणे -

**लोटेवाडी गावाची वैशिष्टे :-**

लोटेवाडी हे गाव सांगोल्यापासून पश्चिम दिशेला ३० कि.मी. अंतरावर आहे. सोलापूर-सांगली जिल्ह्याच्या सीमेवरील गाव आहे. लोटेवाडी गावात शेतीस कृत्रिम पाणीपुरवठ्याची सोय नाही. पावसाच्या पाण्यावरच शेती अवलंबून आहे. लोटेवाडी गावाच्या पश्चिम-दक्षिण बाजूला माणनदी आहे. माण ही नदी कायमस्वरूपी कोरडी असल्यामुळे तिचा शेतीच्या पाण्यासाठी फारसा फायदा होत नाही. गावाची लोकसंख्या ३८५० असून एकूण लोकसंख्येच्या सुमारे ७० टक्के धनगर, मराठा ५ टक्के, अनुसूचित जाती (महार, मांग, चांभार) १५ टक्के, कुंभार, न्हावी, यलमार, मुसलमान, रामोशी, कैकाडी ४ टक्के, ब्राम्हण १ टक्के असे जातीचे वर्गीकरण आहे. लोटेवाडी गावात पूर्वी बारा बलुतेदार पध्दत होती परंतु ती आता मोडकळीस आली आहे.[१२]

गावातील बागाईत क्षेत्र २० टक्के असून ८० टक्के जिराईत क्षेत्र आहे. लोटेवाडी गावात पावसाचे प्रमाण कमी असल्याने कमी पाण्यावर उत्पादन देणारी पिके घेतली जातात. उदा. ज्वारी, बाजरी, कडधान्ये, मका इ. पिके घेतली जातात. थोड्याफार प्रमाणात डाळिंब या फळबागा आहेत. पशुपालन करणारे शेतकरी सुमारे १० टक्के आहेत. हवामान उष्ण व कोरडे आहे. दोन्ही हंगामात पिके घेतली जातात. लोटेवाडी गावातील ८० टक्के जमीन पडीक, खडकाळ, मुरूम प्रकारची आहे. गावात पूर्व-पश्चिम टेकड्यांना उतार आहे. उत्तर दक्षिणेकडे काही उतार, काही सपाट प्रदेश आहे. लोटेवाडी गावातील भौगोलिक स्थिती, वारंवार पडणारा दुष्काळ, शेतकरी शेतमजूरांना रोजगाराची आवश्यकता यामुळे रोजगार हमी योजनेची

कामे पुष्कळ प्रमाणात राबविली आहेत. गावात दोन गाव तलाव आहेत. गावात रोहयोची नालाबंडिंग, कंटुरबंडिंग, शेततळी, ओढ्यावरील बंधारे ही कामे रोहयोमार्फत करून पावसाचे ओढे, नाल्याद्वारे वाहून जाणारे पाणी रोहयो कामामुळे अडविणे शक्य झाले आहे. त्यामुळे भूजलपातळी वाढून विहीरींच्या पाण्याच्या पातळीची क्षमता वाढून बागाईत क्षेत्र वाढण्यास मदत झाली आहे. लोटेवाडी गावातील शेती हाच मुख्य व्यवसाय आहे. सामाजीक वनीकरण विभागामार्फत झाडांची संख्या वाढविण्यात आली आहे. पावसाळ्यात ही पाऊस पडेल याची शाश्वती नसल्यामुळे शेतामध्ये शेतमजूरांना वर्षभर कामे मिळत नाहीत. त्यामुळे शेतकरी व शेतमजूरांना रोहयोच्या कामाशिवाय पर्याय उरला नाही. लोटेवाडी गावातील पश्चिम बाजूला माणनदी काठावरची जमीन ही चिकणमातीचे असल्यामुळे व जमिनीची धूप जास्त प्रमाणात होत असल्यामुळे पिकांसाठी फारशी उपयुक्त ठरत नाही. नोकरी, व्यवसाय करणाऱ्यांची संख्या सुमारे २ टक्के आहे.[१३]

**कटफळ गावाची वैशिष्ठे :-**

कटफळ हे गाव सांगोल्यापासून वायव्य दिशेला ३५ कि.मी. अंतरावर आहे. कटफळ गावाची लोकसंख्या ४२०० आहे. एकूण लोकसंख्येच्या सुमारे ६५ टक्के धनगर, मराठा १५ टक्के, अनुसूचित जातीमध्ये (महार, मांग, चांभार) ह्या जाती १५ टक्के, कुंभार, मुसलमान, न्हावी, कैकाडी, रामोशी इ. ५ टक्के जाती आहेत. कटफळ गावामध्ये २५ टक्के क्षेत्र बागाईत, ७५ टक्के क्षेत्र जिराईत, माळरान, पडीक जमीन आहे. जमीन डोंगराळ, टेकड्यांची, सपाट प्रदेशाची आहे. या गावामध्ये प्रामुख्याने रब्बी ज्वारी, खरीप बाजरी, मका, कडधान्ये ही पिके घेतली जातात. पशुपालन करणाऱ्यांची संख्या सुमारे ७ टक्के आहे. नोकरी, व्यवसाय करणाऱ्यांची संख्या सुमारे ३ टक्के आहे. जमीन काहीशी तांबड्या मातीची, काळसर मुरूमाड प्रकारची आहे. डोंगराळ, टेकड्यांच्या जमिनीला उतार असल्यामुळे ओढे, नाले आहेत. कटफळ गावात शेती हाच मुख्य व्यवसाय आहे. या गावात कृत्रिम पाणीपुरवठ्याची सोय शेतीस नाही. पावसाच्या, विहिरीच्या पाण्यावर शेती अवलंबून आहे. झाडांचे प्रमाण तुरळक आहे. कटफळ गावात ब्रिटिश कालीन गाव तलाव आहे.[१४]

**इटकी गावाची वैशिष्ठे :-**

इटकी हे गाव सांगोल्यापासून वायव्य दिशेला ४० कि.मी. अंतरावर आहे. इटकी गावाची लोकसंख्या

३२५० आहे. एकूण लोकसंख्येच्या सुमारे ४० टक्के धनगर, लोणारी १० टक्के, मराठा २५ टक्के जाती आहेत. जमीन जास्त प्रमाणात डोंगराळ टेकड्याची, काहीश सपाट आहे. इटकी गावातील लोकांचा मुख्य व्यवसाय शेती, पशुपालन हा आहे. जमीन खडकाळ, कमी कसाची, काहीश तांबड्या मातीची आहे. इटकी गावामध्ये ज्वारी, बाजरी, कडधान्ये ही पिके प्रामुख्याने घेतली जातात. झाडांचे प्रमाण तुरळक आहे. डोंगराचा ओसाड भूभाग आहे. १ टक्के लोक व्यवसाय व नोकरी करतात. पर्जन्यमानाचे प्रमाण अत्यंत कमि असून शेती पावसाच्या, विहीरीच्या पाण्याव केली जाते.[१५]

**समारोप :-**

सांगोला तालुक्याच्या वैशिष्ठानुसार सांगोला तालुका हा कमी पर्जन्यमानाचा, पर्जन्यछायेत येणारा, उष्ण तापमानाचा, स्वच्छ हवामानाचा प्रदेश आहे. तालुक्यात कृत्रिम पाणी पुरवठ्याची सोय नाही. तालुक्याच्या भौगोलिक वैशिष्ठामुळे डाळींब, बोर, सिताफळ या फळबागाची मोठ्या प्रमाणात लागवड वाढली आहे. जमिन हलक्या प्रतीची कमि कसाची, पाण्याचा निचरा होणारी आहे. सांगोला तालुक्याचा सामाजिक, स्वातंत्र्य चळवळ मध्ये महत्वाचा सहभाग दिसून येतो. सांगोला तालुक्याच्या भौगोलिक, सामाजिक, आर्थीक, राजकीय वैशिष्ठ्यामुळे रोजगार हमी योजनेची कामे मोठ्या प्रमाणात राबविण्यात आली आहेत.

## संदर्भग्रंथ


१. महाराष्ट्र राज्य - सोलापूर जिल्हा गॅझेटियर, १९७७ ची आवृत्ती, पृ. १,२,३.

२. उपरोक्त, पृ. १८.

३. महाराष्ट्र शासन - महाराष्ट्र जलसिंचन आयोग अहवाल खंड - १, जून १९९९, पृ. ४८,६५,८९.

४. Census of India - 1982 District census Handbook, Sholapur, P. 1,2,3.

५. जिल्हा सामाजिक व आर्थीक समालोचन - जिल्हा सोलापूर, २०००-२००१, पृ. १,२,३,४७.

६. उपरोक्त, पृ. ११,१२.

७. डॉ. इंगोले कृष्णा, सांगोला बागातील बहुजन समाजाची चलवळ (लेख) सर्वोदय साधना वर्षे २१, १६ जानेवारी, १९८२ पृ. ९,१०.

८. दै. केसरी १९२० ते १९३२.

९. साप्ताहिक सांगोला टाईम्स वर्ष २ रे, अंक ९, १५ ऑगष्ट १९७९, पृ. ४.

१०. दै. माणदूत एक्सप्रेस १९९५, २००१.

११. सांगोला टाईम्स (साप्ताहिक) १९९९.

१२. महाराष्ट्र राज्य - सोलापूर जिल्हा गॅझेटियर, २००४ ची आवृत्ती, पृ. ७७,७८.

१३. उपरोक्त, पृ. ७९,८०.

१४. जिल्हा सामाजिक व आर्थिक समालोचन - २००२-२००३ जिल्हा सोलापूर, पृ. १४,१५.

१५. उपरोक्त, पृ. २७,२८,२९.


SHIVAJI UNIVERSITY, KOLHAPUR